'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, April 2023, Volume-15 Issue-10

चलनविषय धोरणाचे अर्थव्यवस्थेवरील परिणाम

प्रा. मनोहर नारायण मोरे

सहाय्यक प्राध्यापक , नूतन विद्या प्रसारक मंडळाचे कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लासलगांव

Corresponding author- प्रा. मनोहर नारायण मोरे

Email- manoharmorey@gmail.com

प्रस्तावना :- चलन विषयक धोरण ही अशी पध्दत आहे कि ज्यामध्ये रिझर्व्हे बँकेची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची आहे चलन विषयक धोरण मध्ये पैशाची उपलब्धता तसेच व्याज दर ठरविणे या प्रक्रियाचा संबंध यामध्ये येतो. चलन विषयक धोरण ठरविण्याचा अधिकार प्रामुख्याने रिझर्व्हे बँकेला आहे. चलन विषयक व्यवस्थापन हे भारतातील आर्थिक व्यवस्थापनातील एक महत्वाचे साधन मानले जाते . कारण भारतीय रिझर्व्हे बँक बँकामधील ठेवी आणि पैशाच्या पुरवठयावर नियंत्रण ठेवते भारतीय रिझर्व्हे बँकेचे पैशाचे पुरवठयाच्या नियंत्रणाचे धोरण म्हणजे चलनविषयक धोरण होय. चलनविषयक धोरणाचा परिणाम संपूर्ण देशाची अर्थव्यवस्थेवर होत असतो. म्हणून ते खूपच काळजीपूर्वक आखावे लागते.

उदिष्टे :-

1) चलनविषय धोरणाचे परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो म्हणून चलनविषयक धोरण काळजीपुर्वक ठरवावे .
2) चलनविषयक धोरण विकसनशील देशात महत्त्वाचे कार्ये करीत असते.
3) चलनविषयक धोरणाचा संबंध बँक व्यवसायाशी कशा पध्दतीने येतो ते ठरविण्याचे उदिष्टे
4) चलनविषयक धोरणांचे महत्वाचे उदिष्टे म्हणजे किंमतीत स्थिरता आणणे होय.
5) चलन विषयक धोरणांचे उदिष्टे म्हणजे आर्थिक वृध्दी साध्य करणे होय.

गृहितके:-

1) चलनविषयक धोरणाचा व अर्थव्यवस्थेचा परस्परसंबंध आहे.
2) चलनविषयक धोरणाचा व किंमतीत वाढ किंवा घट होण्याचा परस्परसंबंध आहे.

माहिती :-

चलनविषयक धोरण असे की ज्याच्याव्दारे देशाच्या मध्यवर्ती बँकेला केला जाणार वित्तपुरवठा त्यांचे नियंत्रण व नियमन केले जाते. चलन विषयक धोरणाचे महत्त्वाचे उदिष्ट म्हणजे देशातील किंमतीत स्थिरता आणणे हे असते तसेच देशाच्या चलनवाढीचे नियंत्रण करणे तसेच देशातील बॅक व्यवसाय पध्दती व्यवस्थीत करणे होय. तसेच देशातील आर्थिक वृध्दी साध्य करणे हे देखील चलनविषक धोरणाचे उदिष्टे असते. चलनविषयक धारेणाव्दारे पैशाची रचना,पैश्यांचा वाटप तसेच व्याजदरांची रचना यांचा देखील विचार या धोरणामध्ये केला जात असतो. तसेच भारतीय रिझर्व्हे बँकेने पतनियंत्रणासाठी जे काही उपाय केलेले आहेत त्यांमध्ये संख्यात्मक साधने जसे कि

1. बँक दर 2. रोख राखीव प्रमाण तसेच तरलता प्रमाण 3. रेपो दर

तसेच गुणात्मक साधने यामध्ये

1. पत नियमन 2. प्रत्यक्ष कृती 3. खात्रीशीर उपाय यांचा समावेश यामध्ये होत असतो.

चलनविषयक धोरण समितीचे महत्त्वाचे कार्ये म्हणजे भारतीय रिझर्व्हे बँकेचे ठरवून दिलेली जी चलनवाढ विषयक लक्ष्ये आहेत ती लक्ष्य प्राप्त करणे हे होय.

भारतीय चलनवाढीचे लक्ष्य साध्य करण्यासाठी भारतीय रिझर्व्हे बँक रेपो दरामध्ये देखील आवश्यकतेनुसार बदल करीत असते. चलनविषयक धोरण समिती व्दारे धोरणात्मक व्याजदराचे निश्चितीकरण केले जाते. या व्याजदराच्या साहय्याने चलनवाढीचे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी ते महत्त्वपूर्ण कार्य करीत असते. आधुनिक अर्थव्यवस्था ही पत अर्थव्यवस्था असते. कारण आधुनिक अर्थव्यवस्थेत सर्व प्रकारे व्यावसायिक व्यवहार पूणे करण्यासाठी पतचलनाची भूमिका महत्त्वपूर्ण असते देशातील पतचलनाच्या नियंत्रणाचे एक महत्त्वाचे साधन म्हणून बँकदरांचे महत्त्व असते.

चलनविषयक धोरणांचे महत्त्व विकसनशील आणि विकसित देशांना आहे . कारण चलनविषयक धोरणाचा प्रत्यक्ष संबंध किंमतीशी येत असल्याने खरेदी विक्री वर त्यांचा परिणाम होतो म्हणून या धारेणाला विशेष महत्त्व आहे. व्यापक आर्थिक उदिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने चलनविषयकअत्यंत महत्त्वाचे वाटते.

निष्कर्ष:-

1) चलनविषयक धोरण हे एक नियामक धोरण असून त्याचा अर्थ व्यवस्थेवर परिणाम होतो.
2) चलनविषयक धोरणामुळे किंमतीवर परिणाम होतो.
3) चलनविषयक धोरण योग्य असेल तर त्याचे अर्थव्यवस्थेवर चांगला परिणाम होतो.
4) चलनवाढीवर नियंत्रण ठेवण्याचे एक महत्त्वाची पध्दत म्हणजे पैश्याच्या पुरवठयावर नियंत्रण ठेवणे होय.
5) चलनविषय धोरणाच्या साहय्याने व्याजदरावर नियंत्रण प्रस्थापित करता येते.

संदर्भ:-

1) चलनविषयक धोरण - प्राचार्य डॉ. बाबासाहेब सांगळे , प्राचार्य डॉ. तानाजी एन साळवे ,प्रा.मुलानी एम उमराव
2) चलनविषयक धोरण - डॉ. भास्कर एच. जगदाळे , डॉ. केवल टी. खैरनार , डॉ. राजेश पाटणे
3) रिझर्व्हे बँकेची वेबसाइट, यु -टयुब वरील माहिती.